# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/12/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## मोटरसायकल चोरी

**१) पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर संताजी वार्ड बुट्टीबोरी येथे दिनांक १४/१२/२०२३ चे १३.०० वा. ते १४.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– क्रिष्णा चिरकुट वंजारी, वय ५४ वर्ष, रा. नवीन वसाहत वार्ड नं. ०५ बुट्टीबोरी ता. जि. नागपुर यांनी त्यांची जुनी वापरती बजाज कंपनीची काळया रंगाची डिस्कव्हर गाडी क्र. एम. एच. –४०/व्ही.– ४५१७ ही किंमती १०,०००/– रू. ही त्याचा पुतण्या नामे– प्रेमदास कामडी याला बहीणीकडुन जावुन येण्यासाठी दिली होती ती गाडी घेवुन तो त्याचे ताईकडे संताजी वार्ड बुट्टीबोरी येथे ठेवली होती परंतु घरातुन बाहेर आला तेव्हा मोटारसायंकल बाहेर लावलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक खान मो. नं. ९८५०२७८९०० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०५ किमी अंतरावर मौजा दादाजी धुनिवाले मठ लोणखैरी नांदा येथे दिनांक १७/१२/२०२३ चे १८.०० वा. ते १९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे–रूपचंद विठोबा आसोले, वय ४१ वर्ष, रा. वार्ड नंबर ३, नांदा हे दादाजी धुनिवाले मठ लोनखैरी नांदा येथे महाप्रसादाचे कार्यक्रमाकरिता स्प्लेंडर गाडी क्रमांक MP-28/MB-9657 ने गेले असता सदर मोटरसायकल ही दादाजी धुनिवाले मठ लोणखैरी नांदा येथील गेटच्या बाहेर उभी करून ठेवली व महाप्रसादाचे जेवण करून परत आल्यावर गेटच्या बाहेर ठेवलेली स्प्लेंडर मोटरसायकल ही दिसली नाही व सदर स्प्लेंडर प्लस मोटरसायकल किंमती ७०००/– रुपये कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा. दिपक रेवतकर बं. नं. १९८७ मो. क्र. ९५४५५२३७३६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**